
V15Pro
Triple Camera
दक्षिणा पेटी

प्रेस नोट दि.०५/०८/२०१९

---

# खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## बाजीराव रोडवरील नातुबाग गणपती मंदीरामधील व इतर दोन मंदिरामधील दानपेट्याची चोरी करणारे अखेर पोलीसांच्या जाळयात

सदर बाबत अधिक माहिती अशी की, खडक पोलीस स्टेशन हद्दीमध्ये दिनांक २४/७/२०१९ रोजी साईबाबा मंदीर गणेश पेठ मंदीरातील, दिनांक २६/७/२०१९ रोजी गणेश नवग्रह मारुती मंदीर घोरपडे पेठ मंदीरामधील व दिनांक ३०/७/२०१९ रोजी बाजीराव रोडवरील नातुबाग गणपती मंदीरातील दानपेटया चोरीस गेल्याच्या घटना घडत होत्या, त्यामुळे मा.भरत जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे यांनी तपास पथकाचे अधिकारी/कर्मचारी व रात्रग्रस्तीवरील पोलीस कर्मचारी यांच्या गस्ती वाढवुन त्यांना योग्य त्या सुचना दिल्या.

तपास पथकाचे प्रभारी अधिकारी श्री उमाजी राठोड सहा पोलीस निरीक्षक खडक पो स्टे पुणे व तपास पथकाचे कर्मचारी खडक पोलीस स्टेशन हद्दीत मंदीरामधील दानपेटी चोरी करणारे चोरटयाचा शोध घेत असतांना पोकॉ आशिष चव्हाण, दिपक मोधे, महावीर दावणे यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, मंदीरामधील दानपेटयाची चोरी करणारे तीन इसम हे सोनावणे हॉस्पीटल शेजारी चालु असलेल्या एस.आर.ए च्या चालु बांधकाम साईडवर पार्कींग मध्ये थांबले अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदरची बातमी मा.भरत जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे यांना सांगुन त्यांचे मार्गदर्शनाखाली बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन इसम नामे १) शाहरुख सल्लाऊद्दीन खतीब, रा.भगवा चौक, काशेवाडी, भवानी पेठ, पुणे २) रमिज इक्बाल हकिम खान, रा. सहारा कॉम्प्लेक्स, चाँदतारा चौक, मोमिनपुरा, घोरपडे पेठ, पुणे ३) बिल्लाल गफुर शेख, रा.भगवा चौक, काशेवाडी, भवानी पेठ, पुणे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास करता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ३०९/२०१९ भा.दं.वि ३८० या गुन्हयात अटक करण्यात आली.

वरील आरोपींकडुन साईबाबा मंदीर गणेश पेठ व नातुबाग गणपती मंदीरातील चोरीस गेलेल्या १५,०००/- रुपये किंमतीच्या दोन दानपेटया व त्यातील रोख रक्कम ७,५३८/- रुपये असा एकुण २२,५३८/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आले व झगडेआळी गणेश नवग्रह मारुती मंदीरातील दानपेटी ही धोबीघाट येथील कॅनॉल मध्ये फेकुन दिल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरच्या चोऱ्या आरोपींनी मौजमजा करण्याकरीत केल्याचे निष्पन्न झाले आहे.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री. श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी श्री.उमाजी राठोड, सहा पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचारी विनोद जाधव, गणेश सातपुते, संदिप पाटील, आशिष चव्हाण, महावीर दावणे, दिपक मोधे, इम्रान नदाफ, राकेश क्षिरसागर, समीर माळवदकर, बंटी कांबळे, प्रमोद नेवसे, रवी लोखंडे, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.

पोलीस निरीक्षक, खडक पोलीस स्टेशन पुणे

(भरत जाधव)
सहा पोलीस निरीक्षक
खडक पोलीस स्टेशन पुणे शहर